# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/८०६

दिनांक : 10 AUG 2017

विषय : NRI आणि PIO/OCI/CIWGC/FN उमेदवारांच्या प्रवेशाबाबत...

संदर्भ : AICTE New Delhi यांचे पत्र क्रमांक AICTE/AB/WR/१-१४६२६१३२/२०१७-१८दि. ४.८.२०१७

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधे ज्या शासकीय व शासन अनुदानीत (विनाअनुदानीत खाजगी संस्था वगळून ) संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने PIO/OCI/ FN/CIWGC करिता Supernumerary quota म्हणून मान्यता दिलेली आहे त्यातील १५% जागांपैकी २/३ (१०टक्के) जागांवर PIO/OCI/FN/NRI मधील उमेदवारांचे प्रवेश (NRI उमेदवारांसाठी ५% मर्यादेपर्यंत) करण्यात यावेत,उर्वरीत १/३ जागांवर CIWGC कोटयातील उमेदवारांना प्रवेश देण्यात यावेत. PIO/OCI/ FN करिताच्या २/३(१० टक्के ) जागांमधून ५ टक्के मर्यादेत NRI उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा उर्वरीत PIO/OCI/ FN उमेदवारांमधून AICTE च्या पत्रात नमूद केलेल्या तरतूदीनुसार व नियमानुसार भरण्यात याव्यात. तसेच CIWGC कोटयातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागाही शासनाने दिनांक २४.४.२०१७ रोजी निर्गमित केलेल्या प्रवेश नियमावली आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या निर्देशानुसार भरण्यात याव्यात.

संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या PIO/OCI/ FN/CIWGC/NRI करिता मंजूर केलेल्या जागांवर प्रवेश करण्याचे अधिकार संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना असल्यामुळे याबाबत संस्था स्तरावरून पुढील कार्यवाही करावी. त्यासाठी संगणकीय प्रणालीमधून नोंदणी केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागवून त्यांची गुणवत्ता यादी तयार करून गुणवत्तेनुसार प्रवेश नियमात विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार करावेत.

(दयानंद मेश्राम)

सहसंचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीस्तव सादर

१. मा.अपर मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई

२. मा.आयुक्त,सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई

३. सर्व संबंधित संस्था

३. कार्यासन क्रमांक ३ (माहिती तंत्रज्ञान कक्ष),मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी